# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/४२/२०१४-१५/२३९ दिनांक : २१.११.२०१४

## आदेश केस क्र. ४२/१४-१५

१) श्री.शहाजी केशव चव्हाण,
मु.पो. घोगांव, ता. पलूस,
जिल्हा - सांगली

\- अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली.

२) कार्यकारी अभियंता, - पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, विटा

३) उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय, किर्लोस्करवाडी

**कोरम:-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव
३. श्री.जी.सी.लेले,सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**
**न्याय निर्णय**

श्री.जी. बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. शहाजी केशव चव्हाण, मु.पो. घोगांव, ता. पलूस येथील घरगुती ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्रमांक २८२०४०८१६४६७/३ असा आहे. महावितरणच्या कुंडल शाखेमधील चव्हाण डीपी घोगांव येथून त्यांच्या घरगुती कनेक्शनला विद्युत पुरवठा करण्यात येतो.

तक्रारीचे स्वरुप

दि. २७.०५.२०१४ ते दि. ०५.०६.२०१४ या कालावधीमध्ये वीज पुरवठा बंद असल्याने महावितरणकडे तक्रार केली होती. तथापि, वीज पुरवठा ६ दिवस बंद राहिला. त्यामुळे कृतीच्या मानकानुसार वीज पुरवठा परत सुरु न झालेने कुचराई करण्यावर दंडात्मक कारवाई विनियम २००५ प्रमाणे करावी. वर नमूद कनेक्शन हे शेती वाहिनीवर असून ते गावठाण वाहिनीवर जोडून मिळावे.

सदर तक्रार प्रथम अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. ०७.०६.२०१४ रोजी दाखल करण्यात आली. कक्षाने दि. ०१.०७.२०१४ रोजी आदेश दिला होता. आदेशाप्रमाणे कार्यवाही न झाल्याने ग्राहकाने मंचाकडे दि. २३.०७.२०१४ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीची सुनावणी कोल्हापूर येथे दि. २१.०८.२०१४ रोजी घेण्यात आली. सुनावणीस तक्रारदार स्वत: हजर होते. कंपनीतर्फे शाखा अधिकारी कुंडल हे हजर होते.

ग्राहकाने दि. २७.०५.२०१४ ते दि. ०५.०६.२०१४ या कालावधीमध्ये वीज पुरवठा बंद असल्याचे सांगितले. कृतीच्या मानकानुसार वीज पुरवठा परत सुरु न झालेने कुचराई करण्यावर दंडात्मक कारवाई विनियम २००५ प्रमाणे करावी. सदर घरगुती कनेक्शन हे शेती वाहिनीवर असून ते गावठाण वाहिनीवर जोडून मिळावे अशी मागणी केली. शाखा अधिकारी, कुंडल यांनी सदर कालावधीमध्ये कुंडल दह्यारी, तुपारी, घोगांव या परिसरामध्ये वादळ वारे व पाऊस झाला होता, त्यामुळे या परिसरात पोल मोडणे, पोल वाकणे, पोल पडणे, तारा तुटणे असे महावितरण कंपनीचे नुकसान झाले होते. एचटी ३० पोल व एलटी १०६ पोलचे नुकसान झाले होते. तसेच एचटीचे ८५ गाळे व एलटीचे १४० गाळे तुटलेले होते. सर्वात पहिल्यांदा कंत्राटदार नेमून मेन लाईनचे कामकाज व त्यानंतर एलटी लाईनचे कामकाज पूर्ण करुन घेण्यात आले. तक्रारदाराचे कनेक्शन हे चव्हाण डीपी घोगांव या रोहित्रावर येते. सदर रोहित्रावरुन निघणाऱ्या एका सर्कीटचे ३ गाळे वायर तुटलेली होती व १ पोल मोडला होता. तसेच दुसऱ्या सर्कीटचे ६ एलटी गाळे तुटलेले होते. त्यामुळे सदर कनेक्शन दि. २७.०५.२०१४ ते ०५.०६.२०१४ नैसर्गिक आपत्तीमुळे बंद पडलेले होते. दुरुस्तीचे कामकाज लवकरांत लवकर पूर्ण करुन सदर ग्राहकाचा विद्युत पुरवठा चालू करण्यात आला. नैसर्गिक आपत्तीमुळे विद्युत पुरवठा बंद असल्यामुळे त्याची जबाबदारी कर्मचाऱ्यावर टाकणे योग्य होणार नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यावर दंडात्मक कारवाई करु नये अशी मंचास विनंती केली. मंचास दिलेल्या त्यांच्या उत्तरासोबत विद्युत उपकेंद्रातील विद्युत पुरवठा खंडित झाल्याचा सविस्तर अहवाल तसेच गाव कामगार तलाठी घोगांव, ता. पलूस यांचे सदर कालावधीमध्ये वादळवारे व पाऊस झाल्याबद्दलचा दाखला देण्यात आला आहे.

वरील विवेचनावरुन कृती मानके विनियम २००५ नुसार नुकसान भरपाई ग्राहकास देणे योग्य होईल काय ?
उत्तर : नाही.

कारणमिमांसा

शाखा अधिकारी, कुंडल यांनी सुनावणीच्या वेळेस वरील केलेल्या अभिकथनानुसार दि. २७.०५.२०१४ ते ०५.०६.२०१४ या दरम्यान ग्राहकाचा विद्युत पुरवठा हा त्या परिसरात झालेल्या वादळी वारे व पाउसामुळेच खंडित झाल्याचे दिसून येते. विद्युत कर्मचाऱ्यांनी सदर कालावधीमध्ये खंडित विद्युत पुरवठा पूर्ववत करण्यासाठी योग्य ते प्रयत्न केल्याचे दिसून येते. तसेच गाव कामगार तलाठी यांच्या प्रमाणपत्रावरुन नैसर्गिक आपत्तीमुळे इलेक्ट्रीक पोल व तारा यांचे नुकसान झाले असे दिसून येते.

त्यामुळे कृती मानके विनियम २००५ नुसार ग्राहकास भरपाई देणे योग्य होणार नाही असे मंचाचे मत झाले आहे. म्हणून प्रश्नाचे उत्तर नकारार्थी देण्यात येत आहे.

सांगली कक्षाकडे ग्राहकाने त्याचा विद्युत पुरवठा शेती वाहिनी ऐवजी गावठाण वाहिनीवर जोडून मिळावा अशी मागणी केल्याचे दिसून येते. त्यावर कक्षाने कार्यकारी अभियंता, विटा यांना चौकशी करुन कार्यवाही करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. परंतु त्यावर कार्यवाही झाली नसल्याचे दिसून येते. मंचातर्फे सदर बाबतीत कार्यकारी अभियंता, विटा यांनी वैयक्तिक लक्ष घालून सदर ग्राहकाचा विद्युत पुरवठा गावठाण वाहिनीवर जोडून देण्यासाठी पुढील कार्यवाही करावी. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) ग्राहकाची भरपाईची मागणी फेटाळण्यात येत आहे.

२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-

दिनांक : (जी. बी. पानकर)

सदस्य सचिव

बी.जी. पवार, अध्यक्ष .. सही/-

जी. सी. लेले, सदस्य .. सही/-

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.